महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्यातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १०६ /२०२४ दि. 22/०५/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, राबोडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २३/०५/२०२४ ते दि. २४/०५/२०२४ रोजी **तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या २५६७ व्या जयंती** निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक जवळ शिशुज्ञान मंदिर शाळेच्या बाजूस मनोरंजनाचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) सिव्हिल हॉस्पिटल कॉर्नर कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने खोपटच्या दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सरळ उथळसर नाका, मॉ. मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खोपट सिग्नल कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने सिव्हील हॉस्पिटल कॉर्नरच्या दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **खोपट सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर वाहने खोपट सिग्नल, कोलबाड नाका, मॉ. मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
ब) सदर वाहने खोपट सिग्नल, चरई कट, अल्मेडा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २३/०५/२०२४ रोजी सकाळी ११:०० ते दि. २४/०५/२०२४ रोजी रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/ विशेष शाखा, ठाणे.

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे /नवी मुंबई /बृहन्मुंबई महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. राबोडी, नौपाडा, ठाणेनगर वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner